# उंबरठा

सरले शैशव, सरल्या बाललीला
मन उंबरठ्या पल्याड चाहूल घेऊ लागले।
अनामिक हुरहुरतेने, उत्सुकतेने
मन ठाव घेऊ लागले ॥१॥

सनई, चौघड्यांचे वेध लागुनी
ओलांडीले उंबरठ्यावरचे माप।
रमले मग संसाराच्या रथात
कळले ना कधी सरले किती आयुष्याचे माप ॥२॥

उतारवयाच्या छायेनी
जाणीव ही करुनी दिली।
सरणावरच्या चाहुलीने
शेवटची उंबरठा पायरी ओलांडली ॥३॥



सौ. अस्मिता श्री. बालेकर
'वंदेमातरम्', नवाथेनगर,
अमरावती.

